# वार्षिक अहवाल

२०१२-१३

॥ नास्ति सेवा समो धर्मः ॥

## डॉ. हेडगेवार सेवा समिती, नंदुरबार

# वार्षिक अहवाल २०१२-१३

डॉ.हेडगेवार सेवा समिती, नंदुरबार हया संस्थेने १९९१ पासुन नंदुरबार जिल्हयात विविध क्षेत्रांमध्ये कामास प्रारंभ केला. गेल्या २२ वर्षात शिक्षण, कृषि आणि कौशल्य विकसन या क्षेत्रात संस्थेने उल्लेखनीय कार्य केले आहे.

२२ वर्षाच्या प्रवासात डॉ. हेडगेवार सेवा समिती ने अथक परीश्रमाने संपूर्ण जिल्हाभर आपला कार्यविस्तार केला आहे. कार्यविस्तार करतांना आपल्या कामातील गुणवत्ता कायम ठेवली व त्याचाच परिणाम म्हणुन आज संपुर्ण जिल्हयात संस्थेचा नावलौकीक आहे.

संस्थेच्या कार्याचा परिणाम म्हणुन **केशव सृष्टी पुरस्कार** आणि शाश्वत ग्रामीण उपजीविका या विषयातील **श्री राजेंद्र दहातोंडे यांना मिळालेला राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार** समितीच्या कार्यात हे पुरस्कार मानबिंदू ठरले.

हा अहवाल सादर करतांना डॉ. हेडगेवार सेवा समितीस आनंद होत आहे.

# डॉ.हेडगेवार सेवा समिती, नंदुरबार

BPT REG.- F / 2268 / DHULE
SRA. REG.- MAHARASHTRA / 2439 / DHULE
80-G Certificate No. (NSK/CIT-1/80-G(5) valid from dated- 01-04-2009)

## विश्वस्त मंडळ (२००९-२०१४)

| | |
|---|---|
| श्री. कृष्णदास काशिनाथ पाटील | अध्यक्ष |
| श्री. रविंद्र गजानन बेलपाठक | उपाध्यक्ष |
| श्री. ललितकुमार बाळकृष्ण पाठक | सचिव |
| श्री. वासुदेव बळवंत राव | खजिनदार |
| श्री. रंगनाथ रुझांजी नवले | सदस्य |
| श्री. नानाभाऊ ओंकार माळी | सदस्य |
| श्री. सुरेश भालचंद्र खानापुरकर | सदस्य |
| श्री. सतिष रामकिसन माहेश्वरी | सदस्य |
| श्री. केदारनाथ रत्नाकर कवडीवाले | सदस्य |
| श्री. जत्र्या लिंबा पावरा | सदस्य |
| सौ. इंदिरा बाबुसिंग पाडवी | सदस्य |

## अ) संस्थात्मक माहिती -

**A) संस्थेचे नाव** - डॉ. हेडगेवार सेवा समिती, नंदुरबार

**i) रजिस्ट्रेशन क्रमांक** - महा./ २४३९ / धुळे दि. १८/०९/१९९१.
- एफ / २२६८ / धुळे दि. २२/०५/१९९२.

**ii) पत्रव्यवहारासाठी पत्ता** - २०, इंदिरा सदन, लोकमान्य कॉलनी,
नंदुरबार फोन क्र.-०२५६४-२२३९१०,२०
**Website - www.hssnandurbar.org**
**E-mail-** hssnandurbar@gmail.com

**B) अहवाल वर्षात कार्यकारीणी मंडळाच्या एकुण झालेल्या सभा - ४.**

**C) लेखापरिक्षकांचे नाव व पत्ता -**

श्री. प्रकाश जी. पाठक
प्रकाश जी पाठक ॲन्ड असोसीएट्स
चार्टड अकौंटटस
१६, अर्थव, विनायक नगर
वाडीभोकर रोड, देवपूर,
धुळे.

**D) Bankers -**

a. State Bank of India
b. Bank of India
c. Bank of Maharashtra
d. Union Bank of India
e. Jalgaon Janata Sah. Bank
f. Dhule & Nanurbar District Bank


## E) कर्मचारी माहिती-

- डॉ. हेडगेवार सेवा समिती, नंदुरबार - ०२
- कृषि विज्ञान केंद्र, कोळदा - १३
- National Initiative Climate Resilient Agriculture - ०२
- National Agriculture Innovation Project - ०४
- लिड क्रॉप - ०२
- प्राथमिक आश्रम शाळा जळखे - १५
- माध्यमिक आश्रम शाळा जळखे - ११
- ट्रायबल डेव्हलपमेंट प्रोजेक्ट - ०३

----------

**एकुण - ५२**

## F) प्रकल्प वृक्ष -




## G) अन्य हितसंबंधी संस्था -

- BAIF
- AGRICULTURAL UNIVERCITIES
- NABARD
- VARIOUS NGO`s

**ब) कार्याची माहिती**

**(i) प्रकल्प, उद्देश व त्यांची कार्ये**

**१. प्रकल्प - प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, जळखे**

**उद्देश -** शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करुन देणे. व शिक्षणासह सुसंस्कारीत व ध्येयप्रवण पिढी उभी करणे.

**कार्य -** नंदुरबार जिल्हयातील एकुण ५२ गावांमधुन ४७३ विद्यार्थी व विद्यार्थीनींचे इ. १ ली ते इ. १० वी पर्यंतचे निवासी शिक्षण उपलब्ध.

**२. प्रकल्प - ग्रामीण उत्थान प्रकल्प (VDP)**

**उद्देश -** ग्रामीण विकासासाठी कार्य करणे व विकासाचे काल सुसंगत मॉडेल उभे करणे.

**कार्य -** या प्रकल्पाअंतर्गत विविध यंत्रणांनी आपापले प्रयोग, प्रात्यक्षीके, प्रशिक्षणे राबवून एकत्रित व समन्वयीत पध्दतीने ग्राम विकास करणे.हा प्रकल्प धडगाव तालुक्यात राबविला जातो.

**३. प्रकल्प - जनजाती विकास प्रकल्प (TDP)**

**उद्देश -** ग्रामीण विकासासाठी कार्य करणे व विकासाचे काल सुसंगत मॉडेल उभे करणे.

**कार्य -** प्रकल्पाअंतर्गत ५०० कुटुंबांसाठी शेतीतुन दरवर्षी उत्पन्नाची सोय करुन देणे जेणे करुन शेतकऱ्यांचे व पर्यायाने त्यांच्या पिढींचे स्तलांतर थांबविणे.

**४. प्रकल्प - राष्ट्रीय कृषि नवोन्मेषी प्रकल्प (NAIP)**

**उद्देश -** नैसर्गीक साधन संपत्तीचा वापर करुन खेडी स्वयंपुर्ण करणे.

**कार्य -** नवापूर तालुक्यातील खांडबारा समुहातील आठ गावांमध्ये नदीवर बांध बांधुन शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी मिळवून देणे व त्यातुन जमीन पाण्याखाली आणणे व भाजीपाला लागवडीतुन उत्पन्न वाढविण्यास मदत करणे.

**५. प्रकल्प - कृषि विज्ञान केंद्र (KVK)**

**उद्देश -** कृषी संबंधीचे आधुनिक तंत्रज्ञान लोकांपर्यंत पोहचवणे

**कार्य -** संपुर्ण जिल्यात वर्षभर विविध कार्यक्रमांच्या माध्यमातुन व प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या भेटी घेवुन शेतकऱ्यांपर्यंत तंत्रज्ञान पोहचविण्याचे कार्य हया केंद्रामार्फत चालते. दरवर्षी ७ दिवसीय कृषी तंत्रज्ञान महोत्सवाचे आयोजन केले जाते.

**(ii) संस्थेच्या कार्याची भौगोलिक व्याप्ती -**

नंदुरबार व धुळे जिल्हा (सध्या नंदुरबार जिल्हयात कार्य सुरु आहे)

**(iii) राज्य व राष्ट्रीय स्तरावरील संस्थेची कामगिरी -**

- खो - खो खेळण्यासाठी आश्रमशाळेतील विद्यार्थिनींची राष्ट्रीय स्तरावर निवड
- १० वी चे विद्यार्थी राज्यात एस.टी. कॅटेगरीत प्रथम व द्वितीय
- केव्हीके अंतर्गत यशस्वी प्रयोग राष्ट्रीय स्तरावर मांडण्याची संधी.

**(iv) भविष्यातील उपक्रम -**

- आरोग्य सेवा
- इंग्लिश मिडीयम स्कुल
- १००० तरुण शेतकरी बांधवांचा मेळावा

# १. डॉ. हेडगेवार सेवा समिती, नंदुरबार

विविध प्रकल्पांच्या माध्यमातुन जिल्हाभरात काम करित असतांना डॉ.हेडगेवार सेवा समितीने खालील कार्यक्रमांचे आयोजन केले. विविध कामांच्या माध्यमातुन जिल्यातील ७०० हुन अधिक गावांपर्यंत संस्था पोहचु शकली आहे.

संस्थागत प्रकल्प जागतीक बँक, केंद्र सरकार, राज्य सरकार तसेच नाबार्ड यांच्या आर्थिक सहाय्याने राबविले जातात.

१. **स्वामी विवेकानंद सार्ध शताब्दी महोत्सव-** स्वामी विवेकानंदांच्या १५० वी जयंती निमित्ताने संस्थेने उद्बोधन कार्यक्रम सर्वसाधारण जनतेसाठी आयोजित केला. अतिशय उत्साहाने प्रतिसाद मिळालेल्या कार्यक्रमास १५० हुन अधिक उपस्थिती होती. कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून श्री. प्रकाश जी. पाठक (लेखापरिक्षक, धुळे) हाते.

२. **मृद्गंध-** संस्थेतील सर्व विकास सहयोगी व त्यांच्या परिवारा सोबत ०३ फेब्रुवारी २०१३ रोजी वार्षिक कार्यक्रम संपुर्ण दिवसभर आयोजित करण्यात आला. वर्षातुन एकदा सर्व विकास सहयोगी (कर्मचारी) संस्थेचे विश्वस्त व सभासद कुटूंबासह एकत्रित येतात. या कार्यक्रमाची आयोजनाची जवाबदारी प्रत्येक वर्षी वेगवेगळया युनिट मार्फत केली जाते. या वर्षाची जवाबदारी जन शिक्षण संस्थानने यशस्वीरित्या पार पाडली.

   हया कार्यक्रमास श्री. अनिल भालेराव, संचालक, गरवारे ग्रुप ऑफ इन्डट्रीज व अध्यक्ष, डॉ. बाबासाहेब आंबेडकर वैद्यकीय प्रतिष्ठान, औरंगाबाद यांचे मार्गदर्शन लाभले. हया कार्यक्रमा सोबत सर्व कुटुंबीयांचा रक्त गट तपासणी कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

३. **प्रशिक्षण-** संस्थेतील सर्व युनिट मधील लेखापाल यांना संस्थेच्या कार्यालयात एकुण १५ दिवसांचे tally विषयाचे प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणाच्या उद्घाटन प्रसंगी संस्थेचे सचिव व प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. प्रशिक्षणात त्यांना अकांऊंट विषयक मार्गदर्शन करण्यात आले. प्रशिक्षणाच्या समारोप प्रसंगी संस्थेचे लेखापरिक्षक श्री. प्रकाश जी. पाठक उपस्थित होते. या प्रशिक्षणाचा परिणाम म्हणुन संस्थेचे ऑडिट १० मे रोजी पुर्ण झाले.

## २. आश्रमशाळा जळखे -

नंदुरबार पासुन १० कि.मी. अंतरावर जळखे या ठिकाणी डॉ. हेडगेवार सेवा समिती संचलित अनुदानित प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा आहे. या आश्रमशाळेत अहवाल वर्षात १ली ते १० वी पर्यंत एकुण ४७३ विदयार्थ्यांनी शिक्षण घेतले. परिसरातील एकुण ५२ गावातील विदयार्थी याठिकाणी शिक्षण घेण्यासाठी आले होते. प्रामुख्याने मजुरीसाठी स्थलांतर करणाऱ्या श्रमिकांच्या मुलांना आश्रमशाळेत प्राधान्याने प्रवेश दिला जातो.

९ खोल्यांची पक्की इमारत आश्रमशाळेच्या मालकीची आहे. **हे बांधकाम स्व. बाळासाहेब आपटे यांच्या खासदार निधीतुन झाले आहे.** स्वयंपाकगृह, भोजनकक्ष तसेच स्वतंत्र व्यायामशाळा आहे. पाणी पुरवठयासाठी स्वतंत्र बोअरवेल ची व्यवस्था आहे.

(गट) कुल ही संकल्पना वर्षभरा साठी राबवली जाते. प्रत्येक कुलात १ ली ते १० वी पर्यंतचे विद्यार्थी असतात, या संकल्पनेत मोठे विद्यार्थी लहान विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणीक विकासात मदत करतात, तर छोटे विद्यार्थी मोठयांकडून शिकून घेतात.

**<u>अहवाल वर्षातील कार्यक्रम -</u>**

आश्रमशाळेत या अहवाल वर्षात खालीलप्रमाणे कार्यक्रम राबविले गेले.

(i) **<u>शारदोत्सव</u> -** नवरात्री च्या काळात आश्रमशाळेत रोज वेगवेगळया स्पर्धा घेऊन शारदोत्सव साजरा केला गेला. या स्पर्धा आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे पाच कुल (गट) पाडुन त्यामध्ये घेतल्या गेल्या. समुहगीतगायन, वक्तृत्व, रांगोळी, केशरचना, प्रश्नमंजुषा, मनोरंजक खेळ इ. स्पर्धांचा यामध्ये सहभाग होता.

(ii) **<u>पाटी पूजन</u> -** दस-याच्या दिवशी सर्व विद्यार्थ्यांनी पाटी पुजनाचा म्हणजेचे सरस्वती पुजनाचा कार्यक्रम केला. या कार्यक्रमासाठी पालक विद्यार्थ्यांना नारळ, पुजा सामग्री घेऊन देत असतात. अतिशय हर्षउल्हासात हा कार्यक्रम संपन्न झाला.

(iii)**<u>स्वामी विवेकानंद जयंती</u> -** आश्रम शाळेत हयावर्षी स्वामी विवेकानंद जयंती निमित्ताने गावात शोभायात्रा काढली. यावेळी सर्व नागरीकांनी शोभायात्रेचे आनंदाने स्वागत केले. भगिनींनी आपले अंगण सुंदर रांगोळयांनी सजविलेले होते.

स्वामी विवेकानंद यांच्या **प्रतिमेचे ३२ गावांमध्ये** सुटीच्या कालावधीत विदयार्थी व शिक्षकांनी **प्रत्यक्ष जाऊन वाटप केले**. आश्रमशाळेत स्वामी विवेकानंद यांच्या जीवनावर बोलु शकतील अशा ७ विदयार्थी वक्त्यांनी परिसरातील १० आश्रमशाळेत जाऊन तेथील विदयार्थ्यांसमोर भाषण केले. एका विद्यार्थ्याने १२ जानेवारी रोजी नवापूर येथील जाहिर कार्यक्रमात स्वामी विवेकानंद या विषयावर विचार मांडले.

(iv)**<u>माता-पिता पुजन</u> -** दिनांक १४ फेब्रुवारी रोजी आश्रमशाळेत मातृ-पितृ पूजन हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाप्रसंगी १५० पालक उपस्थित होते. यावेळी आपल्या आई वडीलांसमोर बसून विदर्याथ्यांनी पुजन करुन त्यांना नमस्कार केला. अतिशय सुंदर असा हा कार्यक्रम सर्वांनाच भावला. **या कार्यक्रमाचे आयोजन दरवर्षी १४ फेब्रुवारी रोजी करावे** असेही ठरले.

याशिवाय गुरुपौर्णिमा, गणेशोत्सव, म.गांधी जयंती, लो.टिळक पुण्यतिथी, गणित दिन, विज्ञान दिन, शिक्षक दिन, भुगोल दिन, मराठी भाषा दिन, सावित्री बाई फुले जयंती, साक्षरता दिन इ. कार्यक्रम अहवाल वर्षात संपन्न झाले.

इ. १० वी च्या **ज्योती रमेश वसावे या विद्यार्थीनीला** १० वी बोर्डातील घवघवीत यशाबद्दल **एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पा कडुन रु. ४००००/- चे बक्षिस प्रदान करण्यात आले.**

# ३. कृषि विज्ञान केंद्र

कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबार द्वारा शेती विषयक नवनवीन संशोधनाचे प्रात्यक्षिक, प्रशिक्षण केले जाते. जिल्हयातील शेतक-यांना उपयुक्त असे कृषि तंत्रज्ञान, विविध पिकांचे वाण, बियाणे निर्मिती, बचत गटांना करता येण्यासारखे कृषिउद्योग यांची प्रत्यक्ष पाहणी केंद्राच्या प्रक्षेत्रावर करता येते तसेच शेतक-यांच्या शेतावरही  करता येते. कृषि विज्ञान केंद्रामध्ये माती परिक्षण, जैविक किड व रोग नियंत्रण पध्दती, प्रमुख अवजारे, जैविक खते यांच्या उत्पादनाच्या आणि प्रसाराच्या सुविधा उपलब्ध असतात तसेच मोबाईल वरुन कृषि विषयक एस.एम.एस., स्वयंचलित हवामान अंदाज देणारी यंत्रणा या सुविधा उपलब्ध असतात. दर दोन महिन्यांनी शेतकऱ्यांसाठी कृषक मंडळाचे आयोजन केले जाते. त्यात शास्त्रज्ञ, प्रगतिशील शेतकरी यांचे चर्चासत्र घडवून आणले जाते. तसेच 'कृषक जागरण' अंकाचे प्रकाशन यावेळी होत असते. हा उपक्रम ९ वर्षापासुन सुरु आहे. आजपर्यंत 'कृषक जागरण' चे एकुण ४६ अंक प्रकाशित झाले असुन ४६ कृषक मंडळाच्या बैठकी झाल्या आहेत.

दरवर्षी कृषि तंत्रज्ञान महोत्सवाचे आयोजन केले जाते व त्यात बचत गटांच्या महिलांकरिता उद्योग परिषद, शेतक-यांसाठी विविध विषयांवरील पीक परिसंवादाचे आयोजन करण्यांत येते. विविध विषयातील शास्त्रज्ञ, स्वयंसेवी संस्थेचे कार्यकर्ते, कृषि अधिकारी, कृषि क्षेत्रातील विद्यार्थी, बचत गटातील महिला व पुरुष तसेच शेतकरी केंद्रास महोत्सवादरम्यान मोठया प्रमाणावर भेट देतात.

या वर्षी ७ वा कृषि तंत्रज्ञान महोत्सव १५ ते २० ऑक्टोबर २०१३दरम्यान मोठया उत्साहामध्ये साजरा झाला. त्यात ३५०० शेतक-यांनी ४०० हुन अधिक गावातून सहभाग नोंदविला तसेच विविध विषयांतील तज्ञांचे मार्गदर्शन लाभले.

कृषि विज्ञान केंद्र व्दारा आत्मा अंतर्गत नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत मिरची वाणांची चाचणी व मिरची वाळविण्याकरिता सोलर ड्रायरचा वापर यांची दोन प्रात्यक्षिके घेण्यात आली असुन त्या विषयीचे अध्ययन सुरु आहे.

## अहवाल वर्षातील कार्यक्रम -

(i) **कांदा बीजोत्पादन कार्यक्रम-** बचत गटांच्या सहभागातुन कांदा बीजोत्पादन कार्यक्रम झाला. सदर कार्यक्रमासाठी मा. कुमुदीनी गावीत, अध्यक्षा, जिल्हा परिषद, नंदुरबार आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार हे उपस्थित होते. **सदर प्रयोगातुन ४०० किलो बीजोत्पादन** बचत गटांने केले.

(ii) **कृषक मंडळ-** प्रत्येक दोन महिन्यांनी कृषक मंडळाचे विविध विषयांवर आयोजन प्रगतशील शेतक-यांकरीता करण्यांत आले. यांत **वर्षभरात ५०० हुन अधिक शेतक-यांनी सहभाग** नोंदविला.

### कृषि विज्ञान केंद्र, सन २०१२-१३ मधील प्रशिक्षण कार्यक्रम :

| प्रशिक्षणार्थी | प्रशिक्षण संस्था | प्रशिक्षणार्थी | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | इतर | | | SC/ ST | | | एकुण | | |
| | | पु. | म. | एकुण | पु. | म. | एकुण | पु. | म. | एकुण |
| शेतकरी | १०२ | ७११ | १७७ | ८८८ | १७८२ | १५८ | १९४० | २४९४ | ३३५ | २८२८ |
| ग्रामीण युवक | ३२ | १२७ | ७३ | २०२ | ३५५ | १५७ | ५१२ | ४८२ | २२९ | ७१३ |
| विस्तार कार्यकर्ते | ५ | ८७ | १५ | १०२ | २१ | १२ | ३३ | १०८ | २७ | १३५ |

**(पु= पुरुष, म= महिला)**

## ३.अ - प्रमूख पिकांची उत्पादकता वाढ-पथदर्शी प्रकल्प

## (Lead Crop)

ग्रामीण विकास विषयक विविध प्रयोगांसाठी 'नाबार्ड' व्दारा प्रमूख पिकांची उत्पादकता वाढ-पथदर्शी प्रकल्प राबविण्यात येत आहे. नंदुरबार जिल्हयातील नवापूर तालूक्यातील खांडबारा कल्स्टर मधील एकूण १४ गावे या कार्यक्रमाअंतर्गत निवडली आहे.

या गावात प्रमुख पिके उदा. भात, सोयाबीन, तूर, रबी ज्वारी प्रयोग या बाबत बिजोत्पादन, प्रात्याक्षिके, प्रशिक्षणे यांच्या माध्यमातून ग्रामस्तरावर पिकांची उत्पादकता वाढविणे अशी संकल्पना आहे.

प्रमुख पिकांचे उत्पादन वाढ अंतर्गत PMRC मिटींग करिता श्री.साळवे, आर. ओ., नाबार्ड, पूणे यांनी प्रकल्पास भेट देवून सदिच्छा दिल्या.

## ३.ब - मुक्त कृषि शिक्षण केंद्र (YCMOU)

प्रशिक्षित मनुष्यबळ निर्मितीव्दारे शाश्वत ग्राम विकासाचा प्रयत्न डॉ. हेडगेवार सेवा समिती व्दारे नंदुरबार जिल्हयात सुरु आहे. त्याचाच एक भाग म्हणुन कृषि विज्ञान केंद्रात यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापिठ, नाशिक संलग्नीत मुक्त कृषि शिक्षण केंद्र चालविले जाते. कृषि क्षेत्रात पदविका व पदवी पर्यंत शिक्षणाच्या करीता २७३ विदयार्थ्यांनी शिक्षणक्रम अभ्यासक्रमात प्रवेश घेतला व एकुण १८ विद्यार्थ्यांनीं B.Sc.(Agri) व १४ विद्यार्थ्यांनी B.Sc.(Horti.) चे शिक्षण पूर्ण केले आहे.

## ३.क - राष्ट्रीय कृषि नवोन्मेषी प्रकल्प

## (National Agriculture Innovation Project)-

राष्ट्रीय कृषि नवोन्मेषी प्रकल्प अंतर्गत शाश्वत ग्रामीण उपजिवीका सुरक्षा प्रकल्प नवापूर तालुक्यातील खांडबारा परिसरातील आठ गावांत सुरु आहे. हा प्रयोग consortium पध्दतीने अमलात आणला जात असून वेगवेगळया सहा संस्था आपापली विकास विषयक संशोधन या ठिकाणी अमलात आणत आहेत. उन्नत कृषि तंत्रज्ञान, फळबाग लागवड, पशुसंगोपन - संवर्धन, जलस्त्रोत संरक्षण-संवर्धन प्रक्रिया उद्योग अशा विविध संशोधनाचे एकत्रित प्रयोग या ठिकाणी राबविण्यात येत आहे. वेगवेगळया प्रयोगासाठी फळबाग धारक गट, जलस्त्रोत उपभोक्ता गट असे यशस्वी समूह तयार करण्यात येत आहे.

**खांडबारा समुहातील शाश्वत उपजिविकेचे साधन प्रकल्पास Appreciation Award देवुन गोवा राज्याचे मा.राज्यपाल यांचा हस्ते श्री राजेन्द्र दहातोंडे यांना सन्मानित करण्यात आले.**

**<u>अहवाल वर्षातील कार्यक्रम -</u>**

(i) **विहीर खोलीकरण करणे-** प्रकल्पाअंतर्गत या वर्षात एकुण **१९ विहीरींचे खोलीकरण** करण्यात आले. खांडबारा समुहातील जवळपास **१०० शेतकऱ्यांना** विहीर खोलीकरणामुळे **पाणी मिळण्यास** मदत झाली.

(ii) **भाजीपाला लागवड-** १३३ शेतकऱ्यांनी या वर्षभरात भाजीपाला लागवड केली. यात प्रामुख्याने वांगी, भेंडी, गवार व कोबी इ. भाजीपाल्यांची लागवड करण्यात आली. सदर भाजीपाला सुरत येथील मार्केटला विक्री केल्यामुळे हया वर्षी शेतकऱ्यांना जास्तीचे उत्पन्न मिळण्यास मदत झाली.

## ३.ड- जलवायु समुत्थानशील कृषिपर राष्ट्रीय पहल (NICRA)

हवामान बदलांचा शेतीवर होणारा परिणाम अभ्यासण्यासाठी भारतीय कृषि अनुसंधान परिषदेने "जलवायु समुत्थानशील कृषिपर राष्ट्रीय पहल (निक्रा)" हा महत्वाकांक्षी प्रकल्प सुरु केला आहे. हवामान बदलाच्या दृष्टीने भारतातील १०० जिल्हयांमध्ये हा प्रकल्प राबविला जात आहे. नंदुरबार जिल्हयातील कृषि विज्ञान केंद्रातर्फे उमराणी ता. धडगाव येथे हा प्रकल्प सुरु आहे.

हवामान बदलामुळे शेतीवर होणाऱ्या परिणामांची तीव्रता कमी करुन शाश्वत उत्पादन मिळविण्यासाठी तंत्रज्ञानाची प्रात्यक्षिके आयोजित केली जातात. या प्रात्यक्षिकांची चार घटकात विभागणी केलेली आहे. त्यात नैसर्गिक संसाधनांचे व्यवस्थापन, पीक उत्पादन, पशुसंवर्धन आणि संस्थात्मक उपाय समाविष्ट आहेत. या प्रत्येक घटकामध्ये विविध तंत्रज्ञानाची प्रात्यक्षिके असतात. हवामान बदलाचा शेतीवर होणारा परिणाम याविषयी राष्ट्रीय स्तरावर जानेवारी २०१३ मध्ये दिल्ली येथे निवडक २० केव्हीके चे प्रयोग व त्याविषयी अनुभव मांडण्यात आले त्यात कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबार व्दारा सादरीकरण करण्यात आले.

**अहवाल वर्षातील कार्यक्रम -**

(i) **कार्यशाळा-** आंबा मोहर संरक्षण याविषयी ०३ एप्रिल २०१२ रोजी उमराणी ता. धडगाव जि. नंदुरबार येथे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. सदर प्रशिक्षणांस ४२ शेतकरी उपस्थित होते.

(ii) **जनावरांचे लसीकरण-** जनावरांचे लसीकरण कार्यक्रमाचे आयोजन NICRA प्रकल्पातील गावांमध्ये करण्यात आले. एकुण ५१७ जनावरांना लसीकरण करण्यात आले.

(iii) **ग्राम उत्थान कार्यक्रम (VDP) -** ग्रामीण विकास विषयक विविध प्रयोगांसाठी 'नाबार्ड' व्दारा ग्राम उत्थान कार्यक्रम राबवण्यात येत आहे. नंदुरबार जिल्हयातील अक्राणी तालुक्यातील शेलकूवी, भोगवाडे, बोरवण ही गावे या कार्यक्रमाअंतर्गत निवडली आहे.

# ४. मध्यभारत वनांचल समृध्दी योजना

या योजने अंतर्गत नैसर्गिक साधन सामग्रीचा वापर करुन शाश्वत आजिवीका निर्माण करता यावी यासाठी योजक यासंस्थेसोबत आपली संस्था नंदुरबार जिल्हयातील सर्व तालुक्यातील ३० गावांमध्ये अभ्यास करीत आहे व असा अभ्यास १०० गावांचा होणार आहे.

# ५.जन शिक्षण संस्थान

डॉ.हेडगेवार सेवा समिती, नंदुरबार संचलित जन शिक्षण संस्थान चा माध्यमातुन व्यावसायिक प्रशिक्षण दिले जाते. ही एक स्वतंत्र संस्था असुन हया संस्थेचा स्वतंत्र वार्षिक अहवाल तयार करण्यांत येत असतो.

## श्रध्दांजली

अहवाल वर्षात संस्थेचे जेष्ठ सदस्य सदाशिव धोंडोपंत जहागिरदार, मुंबई यांचे दु:खद निधन झाले. तसेच माध्यमिक आश्रमशाळेचे विकास सहयोगी सरस्वती चिंतामण पाटील यांचे दु:खद निधन झाले.

संस्थेच्या कार्यकारीणी बैठकीत तसेच वार्षिक सर्वसाधारण सभेत या सर्व मान्यवरांना श्रध्दांजली वाहण्यात आली.

# जन शिक्षण संस्थान

REG. No. - MAHA/ 6016/ 2002/ Dhule

# Board of Management

| | |
|---|---|
| Shri. Krishnadas Kashinath Patil | Chairman |
| Shri. Milind Rajendra Shah | Vice-chairman |
| Shri. Ashish Kamalakar Wani | Member |
| Shri. Charudatta Vamanrao Kalwankar | Member |
| Smt. Shobha Gitaram Shrotriya | Member |
| Smt. Rushabai Ramshing Valvi | Member |
| Shri. Suresh Shankarlal Agrawal | Member |
| State Director of Adult Education | Member |
| District Rural Development Agency | Member |
| District Adult & Continuous Education Officer | Member |
| Joint Secretary (Adult Education) | Member |
| Shri. Girish Suklal Badgujar | Director (I/C) |

जन शिक्षण संस्थानच्या माध्यमातुन विविध प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते. मुख्यतः हया प्रशिक्षणानंतर लाभार्थीचे उत्पन्न वाढण्यांस मदत व्हावी हाच या प्रशिक्षणाचा उद्देश आहे. मागणीनुसार व गरजेनुसार सुध्दा प्रशिक्षणांची सोय उपलब्ध आहे.

जन शिक्षण संस्थानच्या माध्यमातुन महिलांसाठी सुध्दा मोठया प्रमाणावर व्यावसायिक प्रशिक्षण देवून त्यांना स्वयंरोजगारासाठी प्रवृत्त केले जाते.

अहवाल वर्षात वेगवेगळया प्रशिक्षणार्थीनी घेतलेले प्रशिक्षण खालील प्रमाणे.

| | SC | ST | OBC | Minorities | Others | Total |
|---|---|---|---|---|---|---|
| No. of beneficiaries | 375 | 508 | 237 | 04 | 56 | 1180 |

## डॉ. हेडगेवार सेवा समिती, नंदुरबार विकास सहयोगी (कर्मचारी वृंद)
## (३१/०३/२०१३)

| क्र. | विकास सहयोगी | पद |
|---|---|---|
| | **डॉ. हेडगेवार सेवा समिती, नंदुरबार** | |
| १ | श्री.गिरीश बडगुजर | प्रशासकीय अधिकारी |
| २ | श्री. दिलीप जोशी | कार्यालय अधिक्षक |
| | **कृषि विज्ञान केंद्र, कोळदा** | |
| ३ | श्री. राजेंद्र दहातोंडे | कार्यक्रम समन्वयक (प्र) |
| ४ | श्री. रविंद्र पाटील | विषय विशेषज्ञ |
| ५ | श्री. जयंत उत्तरवार | विषय विशेषज्ञ |
| ६ | श्री. पद्माकर कुंदे | विषय विशेषज्ञ |
| ७ | श्री. उमेश पाटील | विषय विशेषज्ञ |
| ८ | श्री. राजेश भावसार | कार्यक्रम सहाय्यक |
| ९ | श्री. विजय बागल | कार्यक्रम सहाय्यक |
| १० | कु. गिता कदम | सहाय्यक |
| ११ | श्री. राहुल नवले | संगणक परिचालक |
| १२ | श्री. कल्याण पाटील | वाहन चालक |
| १३ | श्री. रजेसिंग राजपूत | वाहन चालक |
| १४ | श्री. किरण मराठे | मदतनिस |
| १५ | श्री. कैलास सोनवणे | मदतनिस |
| | **प्राथमिक आश्रमशाळा, जळखे** | |
| १६ | श्री. रमेश शिंदे | मुख्याध्यापक |
| १७ | श्री. प्रमोद सुर्यवंशी | शिक्षक |
| १८ | श्री. अनिल रौंदळ | शिक्षक |
| १९ | श्रीमती. ज्योती वळवी | शिक्षिका |
| २० | श्री. नरेंद्र मराठे | शिक्षक |
| २१ | श्री. महेंद्र निकवाडे | शिक्षक |
| २२ | श्री. अशोक पाटील | शिक्षक |
| २३ | कु. हर्षदा वाघ | शिक्षिका |
| २४ | श्री. भरत जाधव | अधिक्षक |
| २५ | श्री. भिमसिंग चौधरी | कामाठी |
| २६ | श्री. किरण जांभळे | मदतनिस |
| २७ | सौ. गोकुळा पाडवी | स्वयंपाकी |
| २८ | सौ. सुखदा पाठक | स्वयंपाकी |
| २९ | श्रीमती. कमलाबाई वळवी | स्वयंपाकी |
| ३० | श्रीमती. लिलाबाई लांडगे | स्वयंपाकी |
| | | |
| | | |

| | | |
|---|---|---|
| | **माध्यमिक आश्रमशाळा, जळखे** | |
| ३१ | श्री. प्रविण सोनवणे | मुख्याध्यापक (प्र.) |
| ३२ | श्री. रणवीरसिंह पाडवी | शिक्षक |
| ३३ | श्री. योगेश निकुंभ | शिक्षक |
| ३४ | श्री. प्रशांत खाडे | शिक्षक |
| ३५ | श्री. दिपक महाजन | शिक्षक |
| ३६ | श्री. राजाराम यार्दी | लिपीक |
| ३७ | श्री. भरत माळी | प्रयोगशाळा परिचर |
| ३८ | श्री. दिनेश गवळी | शिपाई |
| ३९ | श्री. सुरेश बेडसे | कामाठी |
| ४० | सौ. सलमा पाडवी | स्वयंपाकी |
| ४१ | श्रीमती. संगिता अहिरे | स्वयंपाकी |
| | | |
| | **राष्ट्रीय कृषि नवोन्मेषी प्रकल्प (प्रकल्प कालावधी पुरते)** | |
| ४२ | श्री. विकास गोडसे | रिसर्च असोसिएट |
| ४३ | सौ. रेणूका गायकवाड | सिनीयर रिसर्च फेलो |
| ४४ | श्री. हितेश गावीत | फिल्ड स्टाफ |
| ४५ | श्री. गोपाळकृष्ण पंचभाई | लेखापाल |
| | | |
| | **लिड क्रॉप (प्रकल्प कालावधी पुरते)** | |
| ४६ | सौ. श्रध्दा सौंदणकर | प्रोजेक्ट मॅनेजर |
| ४७ | कु. अंजना गावीत | ॲग्रोनॉमिस्ट |
| | | |
| | **जनजाती विकास प्रकल्प (प्रकल्प कालावधी पुरते)** | |
| ४८ | श्री. धरमदास भिल | प्रोजेक्ट मॅनेजर |
| ४९ | श्री. अमृत वसावे | प्रोजेक्ट अस्सिटंट-१ |
| ५० | श्री. नितीन वळवी | प्रोजेक्ट अस्सिटंट-२ |
| | | |
| | **एन. आय. सी. आर. ए. (प्रकल्प कालावधी पुरते)** | |
| ५१ | श्री. अरुण कदम | सिनीयर रिसर्च फेलो |
| ५२ | श्री. कमलकिशोर देशमुख | सिनीयर रिसर्च फेलो |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

# संस्थेस भेट देणारे मान्यवर

१.मा. डॉ. हरि मोरे, संचालक, विस्तार शिक्षा, म. फु. कृ. वि., राहुरी
२.मा. डॉ. पी. एस. मिन्हास. संचालक, व शास्त्रज्ञ चमु
अजैविक ताण व्यवस्थापन संस्थान, बारामती
३.मा. ओमप्रकाश बकोरीया, जिल्हाधिकारी, नंदुरबार
४.मा.डॉ.संजय अपरांती, पोलिस अधिक्षक, नंदुरबार
५.मा. एस.आर.रंगनायक,मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. नंदुरबार
६.मा. अशोक कांबळे, जिल्हा कृषि अधिकारी, नंदुरबार
७.मा. डॉ. पी. ए. ऊंडे, म. फु. कृ वि., राहुरी
८.मा. कानडे, प्रमुख कृषि प्रक्रिया, म. फु. कृ. वि., राहुरी
९.मा. डॉ. एन. जे. ठाकोर, प्रमुख कृषि प्रक्रिया, कोकण विद्यापिठ, दापोली
१०.मा. डॉ. मधुकर बेडीस, औषधी वनस्पती विभाग, म. फु. कृ. वि., राहुरी
११.मा. शिवकुमार, इंडियन इन्स्टिटयुट ऑफ ग्रासलैन्ड, धारवाड, राजस्थान
१२.मा. सुभाष इनामदार, चेअरमन, ज्ञानदा प्रतिष्ठान, पुणे
१३.मा. प्रकाश जी पाठक, सचिव भोसला मिलिटरी स्कुल, नाशिक
१४.मा.प्रकाश कामत, अखिल भारतीय ग्राम विकास प्रमुख, रांची
१५.मा.अनिल भालेराव, संचालक, गरवारे ग्रुप ऑफ इन्डट्रीज
व अध्यक्ष, डॉ. बाबासाहेब आंबेडकर वैद्यकीय प्रतिष्ठान, औरंगाबाद
१६.मा.माधव बर्वे, शिक्षण तज्ञ, मुंबई
१७.मा.श्रीराम पटवर्धन, संचालक, ग्राम बाल शिक्षण केंद्र, कोसबाड, ठाणे
१८.मा.धुलेश्वर जी, राजस्थान
१९.मा. पदाधिकारी श्री. समर्थ वाग्देवता मंदीर, धुळे
२०.मा. प्रिया सेठीया, अमित सेठीया व वल्लियप्पन चिदंबरम्,युथ फॉर सेवा,चेन्नई




मृदगंध कार्यक्रमास उपस्थित श्री.अनिल भालेराव व मान्यवर



मृद्‌गंध कार्यक्रमास उपस्थित भगिनी



मृद्गंध- रंगभरा कार्यक्रमात चिमुकल्यांनी रंगवलेले छायाचित्र



प्रजासत्ताक दिनी आश्रमशाळेच्या प्रागणात मनोरे सादर करतांनां विद्यार्थी



**TDP प्रकल्पाची पाहणी करतांना श्री. चांदेकर डी.डी.एम.,नाबार्ड**



**TDP प्रकल्पाअंतर्गत भुमीहिन शेतकऱ्यांना शेळी हस्तांतरण**




Lead Crop अंतर्गत शेतकऱ्यांची अभ्यास सहल



ग्रामीण महिलांना आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण




NICRA प्रकल्पांअंतर्गत महिला शेतकरी



कृषि तंत्रज्ञान महोत्सवास बचत गटाची भेट



लिड बँक मॅनेजर श्री. विवरेकर, सचिव- श्री.एल.बी. पाठक, जि.प.,सी.ई.ओ.- श्री. ए. एस.आर.नायक,अध्यक्ष- श्री. के.के.पाटील, कृषि अधिकारी- श्री. कांबळे व मान्यवर



मुक्त कृषी शिक्षण केंद्राचा कार्यक्रमातील सहभागी




संस्था कार्यकारिणी बैठकीत उपस्थित विश्वस्त




स्वामी विवेकानंदांवर भाषण करतांना श्री, प्रकाश पाठक




जन शिक्षण संस्थान तर्फेआयोजित 8 मार्च महिला दिनाच्या कार्यक्रमास उपस्थित महिला



जन शिक्षण संस्थान तर्फेमहिलांना व्यावसायिक प्रशिक्षण



**NAIP प्रकल्पांतर्गत शेतकऱ्यांनी केलेली भाजीपाला लागवड**



**NAIP प्रकल्पांतर्गत विहीर खोलीकरण**




**विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना मा. पोलीस अधिक्षक डॉ. संजय अपरांती**



**कृषि विज्ञान केंद्रबद्दल माहिती घेतांना मा. जिल्हाधिकारी श्री. ओमप्रकाश बकोरिया**

# प्रतिक्रिया

1. मला महाराष्ट्र शासनामार्फत मिळालेल्या उद्यान पंडित पुरस्कारात कोळदे येथील कृषि विज्ञान केंद्राचा सिंहाचा वाटा आहे.

   रामकृष्ण दगडु पाटील
   (गुलाब बापु - प्रगतिशील शेतकरी)
   आसाणे ता.जि.नंदुरबार

2. जन शिक्षण संस्थान मार्फत व्यावसायिक प्रशिक्षण घेवुन मी आज केंद्र संचालिका म्हणुन काम करीत आहे. नवापुर शहरात स्वतंत्र व्यापारी गाळा घेवुन ड्रेस डिझयनिंग चा व्यवसाय उभा करण्यांत मी यशस्वी झाली त्यामुळे जन शिक्षण संस्थान चे मी मन:पुर्वक आभार व्यक्त करते.

   सौ.चिमा कुंवर
   पांघरण पाडा, ता.नवापुर
   जि.नंदुरबार

3. डॉ.हेडगेवार सेवा समिती, नंदुरबार अंतर्गत सुरु असलेल्या NAIP प्रकल्पातुन केलेल्या पाणी वापर संस्था बघीतल्यावर '**विकास प्रक्रियेतील सामुहिक सहभागिता'** सहज लक्षात येते.

   डॉ.माधवराव चितळे
   जलतज्ञ, संभाजीनगर

4. आश्रमशाला में बच्चोकों पढाई के साथ-साथ खेल-कुद को भी महत्व दिया जाता है ! और पुरे दिन का routine देखकर बहुत अच्छा लगा !

   प्रिया सेठीया, अमित सेठीया व
   वल्लियप्पन चिदंबरम्
   युथ फॉर सेवा, चेन्नई

## जन शिक्षण संस्थान, नंदुरबार
### विकास सहयोगी

1. श्री. गिरीश बडगुजर - संचालक, (प्रभारी)
2. श्री. श्याम चौधरी - कार्यक्रम अधिकारी
3. श्री. बाबुलाल माळी - सहा.कार्यक्रम अधिकारी
4. श्री. शरद जोशी - लेखापाल
5. श्री. सुनिल सोनवण - कार्यक्रम सहाय्यक
6. श्री. राहुल चव्हाण - मदतनिस
7. श्री. फतेसिंग पाडवी - वाहन चालक